महाराष्ट्र शासन

# ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई - ४०० ००१

**दूरध्वनी क्र.** :- (०२२) २२६६४६३८

Website:-www.dol.maharashtra.gov.in **E-mail:**- director.dol@maharashtra.gov.in

जा.क्र.३१/ग्रं.ख./जाहिरात/२०२४-२५/ ७५८-५९ दिनांक:- १४/०१/२०२५

प्रति,

मा. संचालक (जाहिरात विभाग)

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,

मंत्रालय, मुंबई -३२.

**विषय :- सन २०२४ या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेल्या ग्रंथांची प्रत ग्रंथालय संचालनालयास पाठविण्यासाठी देण्यात येणाऱ्या जाहिरातीबाबत...**

**महोदय,**

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने समान निधी योजनेंतर्गत राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना संचालनालयातर्फे 'ग्रंथभेट' म्हणून ग्रंथसंच पुरविण्यात येतात.

सदर योजनेसाठी सन २०२४ या कॅलेंडर (१ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४) वर्षात प्रकाशित झालेल्या मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील उपयुक्त ग्रंथांची निवड करण्यासाठी तसेच मराठी भाषेतील ग्रंथांची निवड करुन शासनमान्य ग्रंथांच्या यादीत समावेश होण्याच्या दृष्टीने सन २०२४ या कॅलेंडर वर्षामध्ये प्रकाशित झालेले ग्रंथ, "ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई" यांच्याकडे विनामुल्य भेटी दाखल (complimentary copy) दि. २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यत पाठविण्याची जाहिरात सोबत जोडली आहे.

राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांत विभागनिहाय प्रसिध्दीसाठी जाहिरात पाठविण्यात येत आहे. सदर जाहिरातीची देयके **"ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, नगर भवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई"** यांचे नावे व्दिप्रतीत नमूद पत्त्यावर सादर करण्यास संबंधित वृत्तपत्रांच्या संपादकांस लेखी कळवावे, अशी विनंती आहे. पत्रासोबत विहित नमुन्यातील माहिती व जाहिरात जोडली आहे.

आपला,

**(अशोक मा. गाडेकर)**
**प्र.ग्रंथालय संचालक**

सहपत्र:- वरीलप्रमाणे (जाहिरात व विहित नमूना)

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :-**

मा. सचिव, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई यांना सादर करण्यात येते की, सदर जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर दि. १७/०१/२०२५ रोजी पासून दि. २८/०२/२०२५ पर्यंत ठेवण्यात यावी. त्याचे मराठीतील शिर्षक **"राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानांतर्गत ग्रंथभेट योजनेसाठी सन - २०२४ या कॅलेंडर वर्षातील प्रकाशित ग्रंथ सादर करणे' तर इंग्रजी शिर्षक "Book gift scheme of Raja Rammohun Roy Library Foundation regarding submission of the books published in the calendar year 2024"** असे ठेवावे.

**महाराष्ट्र शासन**

# ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**नगर भवन, मुंबई ४०० ००१**

## राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान अंतर्गत ५० व्या ग्रंथभेट योजनेसाठी सन - २०२४ या कॅलेंडर वर्षातील प्रकाशित ग्रंथ सादर करणेबाबत

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने समान निधी 'ग्रंथभेट' योजने अंतर्गत सन २०२४ या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ खरेदी करुन राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना भेट म्हणून देण्यात येतात.

या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या ग्रंथांची निवड करण्यासाठी तसेच ग्रंथालय संचालनालय स्तरावरुन प्रसिध्द होणाऱ्या 'शासनमान्य ग्रंथ निवड यादी' मध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने सन २०२४ या कॅलेंडर वर्षात ( **दि. १ जानेवारी, २०२४ ते दि. ३१ डिसेंबर, २०२४) प्रकाशित झालेल्या व प्रथम आवृत्ती असलेल्या ग्रंथांची प्रत्येकी एक विनामुल्य प्रत** (Complimentary copy) **ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.**

**दि. २८ फेब्रुवारी, २०२५ नंतर प्राप्त झालेल्या ग्रंथांचा ग्रंथ निवड यादीसाठी विचार केला जाणार नाही. या योजनेसाठी सन २०२४ या वर्षात प्रकाशित झालेले ग्रंथ जर यापूर्वी संचालनालयास पाठविले असल्यास पुन्हा पाठविण्याची आवश्यकता नाही.**

तसेच, मुद्रण व नोंदणी अधिनियम, १८६७ अन्वये मुद्रकाने व ग्रंथ प्रदान अधिनियम, १९५४ अन्वये प्रकाशकाने सदर ग्रंथाची प्रत्येकी एक प्रत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, मुंबई, शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे व शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर येथे पाठविणे आवश्यक आहे. सदर ग्रंथ पोहोचल्याची पोच पावती संबंधीत ग्रंथालयांकडून घ्यावी. ग्रंथालय संचालनालयास संबंधित ग्रंथ पाठवितांना वरीलप्रमाणे ग्रंथ पाठविल्याची पोच पावती ग्रंथांसोबत टपालामार्फत वा समक्ष पाठविण्यात यावी. अधिक माहितीस्तव www.rrrf.gov.in हे संकेतस्थळ अवलोकावे.

**सदरचे निवेदन महाराष्ट्र शासनाच्या** www.maharashtra.gov.in **व ग्रंथालय संचालनालयाच्या** www.dol.maharashtra.gov.in **या संकेतस्थळांवर ठेवण्यात आले आहे.**

**(अशोक मा. गाडेकर)**
**प्र. ग्रंथालय संचालक**

**विहित नमुन्यातील माहिती:-**

| | | |
|---|---|---|
| १. | जाहिरात देण्यात येणाऱ्या कार्यालयाचे नाव | ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई- ४०० ००१ |
| २. | कोणत्या तारखेस / तारखेपूर्वी जाहिरात / निविदा सूचना प्रसिध्द करावयाची आहे. | १७ किंवा १८ जानेवारी, २०२५ |
| ३. | प्रसिध्दीचे स्वरुप | विभाग स्तरीय |
| ४. | जाहिरात किती वृत्तपत्रांमधून व किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे. | प्रत्येक विभागातील एका प्रमुख वृत्तपत्रातून (एकूण सहा विभागातील सहा वृत्तपत्र) व एकाच वेळी जाहिरात प्रसिध्द करावयाची आहे. |
| ५. | जाहिरात देयक कोणाच्या नावे करावयाचे आहे. | ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन मुंबई - ४००००१ |
| ६. | **जाहिरात देयक कोठे सादर करावयाचे आहे.** | ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन मुंबई - ४००००१ (व्दिप्रतीत) |

ग्रंथालय संचालक
ग्रंथालय संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई